# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

डॉ.शैलेंद्र देव
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
मो.नं ९८६०२११७५७

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
**Email :** director.dsd@unigug.ac.in


**पत्र क्र. No.GUG/DSD / 273 /2022** **Dt: 23 /09/2022**

## परिपत्रक

विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य/मा. विभागप्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, युवा महोत्सव इंद्रधनुष्य दि. ५ ते ९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर येथे आयोजित करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र./विविवि/२५६/२०२२ दि. ०६/०९/२०२२ रोजी विद्यार्थी विकास विभागातर्फे आयोजित तीन दिवसीय आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक महोत्सव इंद्रधनुष्य २०२२—२३(२८ सप्टेंबर २०२२ ते ३० सप्टेंबर २०२२) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे घेण्यात येणार होता, परंतू काही कारणास्तव **स्थगित** करण्यात येत आहे.

करिता आंतर महाविद्यालयीन महोत्सव इंद्रधनुष्य, २०२२—२३ **दि. ११ ऑक्टोंबर २०२२ ते १३ ऑक्टोंबर २०२२** च्या दरम्यान गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे आयोजित करण्यात येत आहे. तरी या स्पर्धामध्ये ज्या विद्यार्थ्यांना भाग घ्यायचा असेल, त्यांनी ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या मार्फत रजिस्ट्रेशन फार्म विद्यार्थी विकास विभागात ३० सप्टेंबर २०२२ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत जमा करावे.

धन्यवाद !

रजिस्ट्रेशन लिंक: https://cutt.ly/CCcQcZC

(डॉ. शैलेंद्र देव)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# Gondwana University, Gadchiroli

**Development Department Date: 11th October to 13 October, 2022**

**Venue: Gondwana University, Gadchiroli**

**Inter-Collegiate Cultural Festival - Indradhanushya 2022-23**

| Date | Event | Name of the Competetion | Time | Place |
|---|---|---|---|---|
| स्वागत समारोह | | | १०.३० ते ११.३० | पेंडॉल |
| ११.१०.२०२२ | नृत्य | शास्त्रीय नृत्य (Classical Dance) | ११.३० ते १२.३० | पेंडॉल |
| | | लोक नृत्य ( Folk Dance) | १२.३० ते ३.०० | पेंडॉल |
| | रंगमंचीय कलाप्रकार | मुक नाट्य ( Mine) | ३.०० ते ४.०० | पेंडॉल |
| | | नकला ( Mimicry) | ४.०० ते ५.०० | पेंडॉल |
| १२.१०.२०२२ | संगीत | शास्त्रीय संगीत ( Classical Music) | १०.०० ते ११.०० | पेंडॉल |
| | | सुगम संगीत ( Light Music) | ११.०० ते १२.०० | पेंडॉल |
| | | समुहगीत ( Group Song) | १२.०० ते १.०० | पेंडॉल |
| | | शास्त्रीय ताल वाद्य संगीत (Percussion) | १.०० ते २.०० | पेंडॉल |
| | | शास्त्रीय ताण वाद्य (Non- Percussion) | | पेंडॉल |
| | | पाश्चिमात्य गायन (Solo & Group (western ) | २.०० ते ३.०० | पेंडॉल |
| | | लोगसंगीत वाद्यवृंद (Folk orchestra) | ३.०० ते ४.०० | पेंडॉल |
| | साहित्यीक कलाप्रकार | वादविवाद स्पर्धा (Debate) | १०.३० ते १.०० | विद्यापीठ, सभागृह |
| | | वक्तृत्व स्पर्धा (Elocation) | १.३० ते ३.०० | विद्यापीठ, सभागृह |
| | | प्रश्नमंजुषा (Quiz) ( Selection Round At University Hall ) | ४.०० ते ५.०० | विद्यापीठ, सभागृह |
| | ललितकला | रांगोळी (Rangoli) | सर्व सकाळी ११.०० ते दुपारी १.०० | पदव्युत्तर शैक्षणिक विभाग वर्ग खोली |
| | | स्थळ छायाचित्रण (On Spot photography) | | |
| | | स्थळचित्र (On Spot Painting) | | |
| | | पोस्टर मेकींग (Poster Making) | | |
| | | व्यंगचित्र (Cartooning) | | |
| | | माती कला (Clay Modelling) | | |
| | | चिकटकला (Collage) | | |
| १३.१०.२०२२ | रंगमंचीय कलाप्रकार | एकांकिका (One act play) | १०.३० ते २.०० | पेंडॉल |
| | | प्रहसन (Skit) | २.०० ते ३.०० | पेंडॉल |
| | | प्रश्न मंजुषा (Final Raund) | १.०० ते ३.०० | विद्यापीठ, सभागृह |
| | आभार प्रदर्शन | | ४.०० ते ५.०० | पेंडॉल |

टिप: १. ललीतकला या प्रकारातील स्पर्धांचे विषय वेळेवर देण्यात येईल.

२. मातीकला प्रकारासाठी माती स्वत: आणावी.

३. स्पर्धेत सहभागी प्रतियोगींनी लागणारे सर्व संच, वाद्य, वाद्यवृंद तसेच भाग घेतलेल्या कलाप्रकारात लागणारे सर्व साहित्य स्वत: आणावे.

(डॉ. शैलेंद्र देव)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI**
(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 &
Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)
**Office of the Director Students' Development**

डॉ.शैलेंद्र देव
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
मो.नं ९८६०२११७५७

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
**Email :** director.dsd@unigug.ac.in

पत्र क्र. **No.GUG/DSD / /2022** **Dt: 23 /09/2022**

## आंतर महाविद्यालयीन संस्कृतीक समारोह इंद्रधनुष्य २०२२—२३

## कला प्रकार व नियमावली

## दि. ११ ऑक्टोंबर २०२२ ते १३ ऑक्टोंबर २०२२

## स्थळ: गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

कलाप्रकार:—

१. संगीत

अ) शास्त्रीय गायन (भारतीय / कर्नाटकी) (Classical Vocal)

आ) शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) (Classical Instrumental-Percussion)

इ) शास्त्रीय वाद्य संगीत (स्वर वाद्य) (Classical Instrumental-Non Percussion)

ई) सुगम संगीत (भारतीय) (Light Vocal - Indian)

उ) पश्चिम गायन (पाश्चिमात्य) (Western Vocal - Solo)

ऊ) भारतीय समुहगान (Group Song - Indian)

ए) पाश्चिमात्य समुहगान (Group Song - Western)

ऐ) लोकसंगीत वाद्यवृंद (Folk Orchestra)

२. नृत्य

अ) लोक/ आदिवासी नृत्य (Folk/Trial Dance)

आ) शास्त्रीय नृत्य (भारतीय) (Classical Dance)

३. साहित्यिक कलाप्रकार

अ) प्रश्नमंजुषा (Quiz)

आ) वक्तृत्व स्पर्धा (Elocution)

इ) वादविवाद स्पर्धा (Debate)

४. रंगमंचीय कलाप्रकार

अ) एकांकिका (One Act Play)

आ) प्रहसन (Skit)

इ) मूकनाट्य (Mime)

ई) नकला (Mimicry)

५. ललित कला

अ) स्थळचित्र (On the spot Painting)

आ) चिकटकला (Collage)

इ) पोस्टर मेकींग (Poster Making)

ई) माती कला (Clay modeling)

उ) व्यंगचित्र (Cartooning)

ऊ) रांगोळी (Rangoli)

ए) स्थळ छायाचित्रण (Spot Photography)

# नियमावली:—

## १. संगीत

अ) शास्त्रीय गायन (भारतीय / कर्नाटकी) **(Classical Vocal)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. सादरीकरणाकरिता १०(दहा) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
४. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय/कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचचा वापर करावा लागेल.
५. या स्पर्धेमध्ये चित्रपटातील गीतांचे सादरीकरण करता येणार नाही.
६. राग किंवा रचनेची निवड करत असताना पुरेसा विचार व काळजी स्पर्धकांनी घ्यावयाची आहे.
७. परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारित राहील.

आ) शास्त्रीय वाद्य संगीत (ताल वाद्य) **(Classical Instrumental-Percussion)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. सादरीकरणाकरिता १०(दहा) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
३. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
४. सदर कला प्रकाराकरीता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
५. सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरीता स्वत:ची वाद्ये आणावी लागतील.
६. स्पर्धकास सादरीकरणाकरीता भारतीय/कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
७. परीक्षकांचा निर्णय, रागाची निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवत्तेवर आधारित राहील.

इ) शास्त्रीय वाद्य संगीत (स्वर वाद्य) **(Classical Instrumental-Non Percussion)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. सादरीकरणाकरिता १० (दहा) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०५(पाच) मिनिटांचा कालावधी देण्यात येईल.
४. सहभागी स्पर्धकांना कला सादरीकरणाकरिता स्वत:ची वाद्ये आणवी लागतील. प्रक्रीयक वाद्या (सिन्थेसायझर) चा उपयोग करता येणार नाही.

५. सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
६. भारतीय राग प्रणालीचा वापर करणारी पाश्चिमात्य उगमाची वाद्ये वापरता येतील.
७. स्पर्धकास सादरीकरणाकरिता भारतीय/कर्नाटकी यापैकी कोणत्याही एका शैलीचा वापर करावा लागेल.
८. परीक्षकांचा निर्णय ताल, रागाची, निवड, रचना आणि प्रभाव यातील गुणवेत्तर आधारित राहील.

## ई) सुगम संगीत (भारतीय) **(Light Vocal - Indian)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरीता कमाल ०५(पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. सदर कला प्रकाराकीता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
४. सादरीकरणाकरिता ०६(सहा) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
५. गैरचित्रपट गीते, गझल, भजन आणि अभंग या कलाप्रकारात सादर करता येतील.
६. स्वर, ताल, रचना आणि प्रभाव यावर परीक्षकांचा निर्णय आधारीत राहील.

## उ) पश्चिम गायन (पाश्चिमात्य) **(Western Vocal - Solo)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ एका स्पर्धकास या स्पर्धेत सहभागी होता येईल.
२. मंच तथा वाद्य व्यवस्था करण्याकरिता कमाल ०५ (पाच) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
३. सदर कला प्रकाराकरिता कमाल दोन साथीदारांचा वापर करता येईल.
४. सादरीकरणाकरित ०६ (सहा) मिनीटांचा कालावधी देण्यात येईल.
५. गाणे केवळ इंग्रजी भाषेतील असावे.
६. स्वर, ताल, रचना आणि प्रभाव यावर परिक्षकांचा निर्णय आधारित राहील.

## ऊ) भारतीय समुहगान **(Group Song - Indian)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक चमुला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीपर तर दुसरे गीत लोक संगीतावर आधारित राहील.
३. एका चमुमध्ये कमाल ०६(सहा) गायक आणि कमाल ०३(तीन) साथीदारांचा समावेश राहील. तथापि गायक हे सादरीकरणा दरम्यान वाद्ये वाजवू शकतील.
४. चित्रपट गीते सादर करता येणार नाही.
५. प्रत्येक चमूला सादरीकरणाकरिता कमाल १०(दहा) मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील ज्यामध्ये मंच व वाद्य रचना करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापी मंच व वाद्य रचनेकरीता ०५(पाच) मिनिटांपेक्षा अधिक कालावधी देण्यात येणार नाही.

## ए) पाश्चिमात्य समुहगान **(Group Song - Western)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरीता निवडण्यात येणारे गीत केवळ इंग्रजी भाषेत असावे.
३. प्रत्येक चमूला दोन गाण्यांचे सादरीकरण करावे लागेल ज्यामध्ये एक गीत देशभक्तीपर तर दुसरे गीत लोक संगीतावर आधारित राहील.
४. एका चमूमध्ये कमाल ०६ (सहा) गायक आणि कमाल ०३ (तीन) साथीदारांचा समावेश राहील. तथापी गायक हे सादरीकरणादरम्यान वाद्ये वाजवू शकतील.
५. चित्रपट गीते सादर करता येणार नाही.
६. प्रत्येक चमूला सादरीकरणाकरीता कमाल १० (दहा) मिनिटांचा वेळ उपलब्ध राहील. ज्यामध्ये मंच व वाद्य चना करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात आलेला वेळ समाविष्ट राहणार नाही. तथापि मंच व वाद्य रचनेकरीता ०५(पाच) मिनिटांपेक्षा अधिक कालावधी देण्यात येणार नाही.
७. परीक्षकांचा निर्णय हा केवळ गायनाच्या दर्जावर आधारित राहील. यामध्ये वेषभुषा व चमुच्या कृतीवर गुणदान करण्यात येणार नाही.

## ऐ) लोकसंगीत वाद्यवृंद **(Folk Orchestra)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. एका चमुमध्ये साथीदारांसह कमाल १२(बारा) स्पर्धक सहभागी होऊ शकतील.
३. केवळ मुले/मुली किंवा मिश्र पद्धतीचा समुह यामध्ये सहभागी होऊ शकेल.
४. किमान ०७(सात) कमाल १०(दहा) मिनिटांचा कालावधी राहील.
५. वाद्य, मंच रचनेकरीता कमाल १०(दहा) मिनिटांचा कालावधी राहील.
६. व्यावसायिक साथीदारांना विद्यार्थी कलावंतापासून काही अंतरावर उभे/बसून सादरीकरण करता येईल. मात्र त्यांना चमुचे नेतृत्व करता येणार नाही.
७. लेक संगीतातील ज्या स्वरमालिकांना लोक संगीत म्हणून अधिकृत मान्यता आहे अशा स्वरमालिकांची प्राधान्याने निवड करण्यात यावी.

२. नृत्य

अ) लोक/ आदिवासी नृत्य **(Folk/Trial Dance)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमू या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. कमाल १०(दहा) स्पर्धक या कलाप्रकारात सादरीकरण करू शकतील ज्यामध्ये केवळ मुले/मुली अथवा मिश्रगट सहभागी होऊ शकेल.
३. कमाल (०५) पाच साथीदार या कलाप्रकाराकरीता साथसंगत करू शकतील.
४. नृत्य हे लोकनृत्य (भारतीय शैली) मधील असावे. यामध्ये शास्त्रीय नृत्याचा समावेश नसावा.
५. कलाप्रकारच्या सादरीकरणाकरीता कमाल १०(दहा) मिनीटांचा कालावधी दिला जाईल.
६. नोंदणी कक्षामध्ये सादरीकरण करत असलेल्या लोकनृत्याची संकल्पना व संपूर्ण लोकगीत ०३(तीन) प्रतीमध्ये सादर करावे लागेल.
७. सहभागी चमुचे सादरीकरणानंतर रंगमंचावर केलेली सजावट तथा साहित्य काढून नेण्याची जबाबदारी सहभागी चमूंची राहील.
८. पंचाचा निर्णय हा ताल, रचना, भावमुद्रा, रंगभूषा, वेषभूषा, साहित्य, तथा एकूण प्रभाव यावर गुणदान करून घेतला जाईल.
९. रंगमंच तथा वाद्यवृंद व्यवस्थेकरीता १०(दहा) मिनिटांचा कालावधी उपलब्ध करून दिला जाईल.

आ) शास्त्रीय नृत्य (भारतीय) **(Classical Dance)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक कलावंत या कलाप्रकारात सहभागी होऊ शकेल.
२. शास्त्रीय नृत्य हे कोणत्याही अधिकृत नृत्यशाळेतील मान्यताप्राप्त प्रकारावर आधारित असावे. जसे कथ्थक, कथ्थकली, भरतनाट्यम, मनीपुरी, कुचीपुडी, माहिनीअट्टम.
३. सादरीकरणाकरीता कमाल १५(पंधरा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
४. कमाल ०३(तीन) साथीदार या कलाप्रकाराकरीता साथसंगत करू शकतील.
५. पंचाचा निर्णय हा ताल, तंत्र, लय, अभिनय, वेषभूषा, पदलालित्य व सामान्य प्रभाव यावर आधारभूत असेल.
६. कलावंतास नृत्याचे स्पष्टीकरण देणारे सारांश आणि साथीला उपयोगात आणल्या जाणारे गीत त्याचे हिंदी अथवा इंग्रजीमध्ये अनुवाद करून नोंदणी करतेवेळी ०३(तीन) प्रतीमध्ये नोंदणी कक्षावर सादर करावे लागेल.

३. साहित्यिक कलाप्रकार

अ) प्रश्नमंजुषा **(Quiz)**

१. या कलाप्रकारात ०३(तीन) विद्यार्थ्यांचे एक चमू सहभागी होऊ शकेल.
२. विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा प्राथमिक फेरीमध्ये घेतली जाईल व त्यामधून अंतिम फेरीकरीता चमूंची निवड केली जाईल.
३. अंतीम फेरीसाठी मौखिक तथा दृकश्राव्य पद्धतीवर आधारित प्रश्न विचारले जातील.
४. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी या स्पर्धेच्या मूल्यांकनासंबंधी उत्तर देण्याकरिता उपलब्ध असलेला कालावधी आणि फेरीचा प्रकार सहभागी चमूला उपलब्ध करून दिला जाईल.

आ) वक्तृत्व स्पर्धा **(Elocution)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक वक्ता यामध्ये सहभागी होऊ शकेल.

२. सादरीकरणाकरिता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.
३. प्रत्येक वक्त्याला कमाल ०५(पाच) मिनिटांचा अवधी सादरीकरणाकरीता उपलब्ध करून दिल्या जाईल.
४. व्यवस्थापकांच्या सभेमध्ये वक्तृत्वाचे विषय सांगितले जातील.
५. सदरीकरण हे गद्य किंवा पद्यावर आधारित असावे. यामध्ये गीतांचा वापर करता येणार नाही.
६. वक्त्यांचा क्रम हा भाग्यचक्रानुसार ठरविला जाईल.

### इ) वादविवाद स्पर्धा (Debate)

१. वादविवादाकरीता प्रत्येक विद्यापीठाचे ०२(दोन) वक्ते सहभागी होऊ शकतील. ज्यामध्ये एक वक्ता विषयाच्या बाजूने तर दुसरा वक्ता विषयाच्या विरोधात सादरीकरण करेल.
२. सदरीकरणाकरीता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.
३. वादविवादाचा विषय व्यवस्थापकांच्या सभेमध्ये जाहीर केला जाईल.
४. वाचून सादरीकरण करता येणार नाही.

### ४. रंगमंचीय कलाप्रकार

### अ) एकांकिका (One Act Play)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमु या कलाप्रकारामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरीता कमाल ३०(तीस) मिनिटांचा कालावधी उपलब्ध राहील.
३. वेळेची गणना सूचना दिल्यानंतर किंवा चमुने सादरीकरण आरंभ केले यापैकी जे आधी घडले तेव्हापासून केले जाईल.
४. रंगमंच व्यवस्था व संच / साहित्य निर्मूलन करण्याकरिता १०(दहा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
५. कमाल ०९(नऊ) पेक्षा अधिक कलावंत तेच ३(तीन) पेक्षा अधिक साथीदार यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश नसावा. सहभागी संघाना संच व साहित्य स्वत:चे आणावे लागेल. सामान्य प्रकाश व्यवस्था व सामान्य साहित्य पूर्वसूचनेनुसार पुरविले जाईल.
६. सादरीकरणांकरीता मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा उपयोग करावा लागेल.
७. सहभागी चमुंनी अर्धा तास पूर्वी स्पर्धेच्या संयोजकास संपर्क करणे आवश्यक राहील.
८. परीक्षकांचा निकाल हा संकल्पना, अभिनय, नेपथ्य, रंगमंच व्यवस्था, सादरीकरण व सामान्य प्रभाव यांवर आधारित राहिल.
९. पार्श्वसंगीताकरिता साथीदार हे वाद्यांचा वापर करू शकतील किंवा त्यांना पडद्याआडून सादरीकरण करावे लागेल. साथीदार हे रंगमंचावर उपस्थित होऊ शकणार नाही.

### आ) प्रहसन (Skit)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून एक चमू या कलाप्रकारामध्ये सहभागी होऊ शकेल.
२. एका चमूमध्ये कमाल ०६(सहा) विद्यार्थ्यांचा समावेश राहील.
३. सदरीकरणाकरीता कमाल १०(दहा) मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
४. रंगभूषा, वेषभूषा व पार्श्वसंगीताचा वापर सादरीकरणादरम्यान करता येईल. वैयक्तिक टीका, निंदा नालस्ती, चारित्र्य हनन करता येणार नाही.
५. सहभागी चमूंनी सादरीकरण करीत असलेल्या संकल्पनेच्या ०३(तीन) प्रती लेखी स्वरूपात नोंदणीच्या वेळी सादर कराव्या.
६. संकल्पना, अभिनय, नेपथ्य, संरचना व सामान्य प्रभाव यावर आधारीत परिक्षकांकडून परीक्षण केले जाईल.
७. सादरीकरणदरम्यान अश्लील अथवा अन्योक्ती प्रकार टाळावे. निरूपद्रवी उपहास किंवा विनोद सादरीकरणादरम्यान अभिप्रेत आहे.

### इ) मूकनाट्य (Mime)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) चमू या स्पर्धेत सादरीकरण करू शकेल.
२. संघामध्ये कमाल ०६(सहा) स्पर्धक समाविष्ट होऊ शकतील.
३. परीक्षकांचा निर्णय संकल्पना, सृजनशीलता, रंगभूषा, पार्श्वसंगीत व सामान्य प्रभाव यावर आधारित राहील.
४. सादरीकरणाकरिता कमाल ०५(पाच) मिनीटांचा कालावधी उपलब्ध राहील.

५. कमाल ०२(दोन) साथीदार यामध्ये साथसंगत करू शकतील.
६. सादरीकरण हे पांढऱ्या /काळ्या रंगातील शरीराला घट्ट चिकटणाऱ्या (स्कीनटाईट) कपड्यांचा वापर करून करता येईल. तसेच कलावंताचे मुखवटे हे आवश्यक त्या रंगात रंगविलेले असावे.

### ई) नकला (Mimicry)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१ (एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. सादरीकरणाकरीता कमाल ०५(पाच) मिनिटांचा कालावधी उपलब्ध राहील.
३. स्पर्धक विविध उपकरणांचे आवाज तसेच प्रसिद्ध व्यक्तींचे किंवा अभिनेत्यांच्या आवाजाच्या नकला करून सादरीकरण करू शकतील.
४. प्रीक्षकांचा निर्णय हा नकलांचे कौशल्य, विविध आवाजांची विविधता, सादरीकरण व सामान्य प्रभाव यावर आधारीत राहील.

## ५. ललित कला

### अ) स्थळचित्र (On the spot Painting)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. प्रत्येक स्पर्धकाला दिलेल्या विषयावर आधारीत स्थळचित्र स्पर्धा स्थळी काढावे लागेल.
३. कमाल वेळ मर्यादा हि ०२ तास ३० मिनीटांची राहील.
४. स्पर्धकास २२ इंच व १५ इंच इतक्या आकाराच्या रेखाचित्र कागदावर चित्र काढावे लागेल.
५. काढण्यात येणारे चित्र तैल, पाणी, पोस्टर किंवा पेस्ट रंगामध्ये काढता येईल.
६. श्रंगकामाकरीता आवश्यक असलेले साहित्य जसे—कुंचले, रंग, पेन्सील आदि स्पर्धकास स्वत: आणावे लागेल. आयोजकांमार्फत कागद स्पर्धास्थानी पुरविल्या जाईल.

### आ) चिकटकला (Collage)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धकास विषय वेळेवर दिला जाईल. तसेच विषयानुसार कृती करण्याकरीता स्पर्धकास २२ इंच व १५ इंच इतक्या आकाराचा कागद पुरविल्या जाईल.
३. क्माल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
४. स्पर्धकाला स्पर्धेकरीता आवश्यक असलेले साहित्य जसे—कात्री चिकटविण्याकरीता आवश्यक साहित्य आणि इतर स्वत:चे आणावे लागेल.
५. चिकटकला ही जुन्या मासिकांच्या कागदांवरून तयार करावी लागेल.

### इ) पोस्टर मेकींग (Poster Making)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. पोस्टर तयार करण्याकरीता आवश्यक असलेला विषय वेळेवर दिला जाईल.
३. कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
४. स्पर्धकास आवश्यक साहित्य स्वत:चे आणावे लागेल व आयोजकांमार्फत स्पर्धकास २२ इंच व १५ इंच इतक्या आकाराचा कागद पुरविल्या जाईल.

### ई) माती कला (Clay modeling)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धा एका निर्धारित स्थळी घेतली जाईल.
३. कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
४. विषय व विशेष नियम स्पर्धास्थानी कळविले जातील.
५. कला सादरीकरणाकरिता आवश्यक ती माती आयोजकांमार्फत स्पर्धा स्थळी पुरविल्या जाईल.

### उ) व्यंगचित्र (Cartooning)

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. स्पर्धकरीता विषय वेळेवर दिला जाईल.
३. कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
४. स्पर्धकास आवश्यक साहित्य स्वत:चे आणावे लागेल व आयोजकामार्फत स्पर्धकास २२ इंच व १५ इंच इतक्या आकाराचा कागद पुरविल्या जाईल.

ऊ) रांगोळी **(Rangoli)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१(एक) स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
३. कला सादरीकरणाकरिता रांगोळी पावडर, कलर पावडर, फुलपाकळ्या, भुसा किंवा विविध डाळींचा वापर करता येऊ शकेल.
४. स्पर्धकाला निर्धारित करून देण्यात आलेल्या जागेवरच स्वत:ची कला सादर करावी लागेल.

ए) स्थळ छायाचित्रण **(Spot Photography)**

१. प्रत्येक विद्यापीठ/महाविद्यालयातून केवळ ०१ स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होऊ शकेल.
२. सहभागी स्पर्धकांनी १२ मेगा पिक्सेल पेक्षा अधिक नसेल इतका डिजीटल कॅमेरा स्वत: आणावा लागेल.
३. डिजीटल कॅमेरामध्ये मेमरी कार्ड असावे. जे स्पर्धा आरंभ होण्यापूर्वी परिक्षकांद्वारे फॉरमॅट केले जाईल.
४. कमाल वेळ मर्यादा ही ०२ तास ३० मिनिटांची राहील.
५. परिक्षकांद्वारे वेळेवर घोषीत होणाऱ्या विषयांची ०५(पाच) छायाचित्र काढावे लागतील.
६. छायाचित्रांचे मिक्सींग, मॅचिंग किंवा मॉर्फींग करता येणार नाही.
७. फोटोशॉप इत्यादीसारखे सॉफ्टवेअर वावरण्याची अनुमती राहणार नाही.
८. आयोजकांना काढलेली छायाचित्रे आवश्यक त्याठिकाणी वापरण्याची अनुमती राहील.
९. डिजीटल इमेजसचे परीक्षण हे प्रभाव, सरचना, तांत्रिकीस्तर व अनुरूपता यावर आधारीत केले जाईल.
१०. उपरोक्त व्यतिरिक्त अधिक सूचना वेळेवर देण्यात येईल.

(डॉ. शैलेंद्र देव)
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली